# आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग,
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# ऑनलाईन संमंत्रण सत्रे (Counselling Sessions) सूचना
# एम.ए. (सर्व विषय) आणि एम.कॉम.प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी सूचना

**शैक्षणिक वर्ष 2023-24 मधील प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांचे आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे हार्दिक स्वागत.**

आपणास माहित आहेच की, शैक्षणिक धोरण 2020 नुसार सत्र पद्धती (Semester Pattern) लागू झाली आहे. दोन सत्रांत दोन वेळा परीक्षांचे आयोजन केले जाणार आहे. सर्व शिक्षणक्रमांतर्गत संमंत्रण सत्रांचे (Counselling Session) दोन वेळा म्हणजेच प्रथम सत्राचे ऑक्टोबर मध्ये तीन रविवार आणि दुसऱ्या सत्राचे 15,जानेवारी 2024 नंतरचे तीन रविवार याप्रमाणे वर्षभरात एकूण सहा रविवार Google Meet या माध्यमाद्वारे ऑनलाईन आयोजन केले जाणार आहे. सध्या प्रथम सत्राचे वेळापत्रक व प्रथम वर्षाची शिक्षणक्रम संरचना विषयनिहाय सोबत पाठवत आहोत. संमंत्रण सत्रे आणि शिक्षणक्रमांतर्गत करावयाच्या कार्याबाबत खालीलप्रमाणे नमूद केल्यानुसार मुद्दे लक्षात घ्यावयाचे आहेत.

❖ **संमंत्रण सत्रांना उपस्थिती बाबत**

- एम.ए.मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, संरक्षण व सामरिकशास्त्र, अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र,समुपदेशन मानसशास्त्र आणि एम.कॉम. शिक्षणक्रमांतर्गत शनिवार दिनांक 07/10/2023 रोजी दुपारी 3.00 ते 5.00 वाजेदरम्यान शिक्षणक्रम अंतर्गत सविस्तर माहिती देण्यासाठी परिचयपर सत्र Google Meet या माध्यमाद्वारे ऑनलाईन पद्धतीने आयोजित केले जाणार आहे. संपूर्ण वर्षभर आपणास कोणकोणत्या बाबी करावयाच्या आहेत यावर मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यानंतर रविवार, दिनांक 08/10/2023 पासून विषयांची ओळख करून देण्यासाठी संमंत्रण सत्रांचे आयोजन केले जात आहे. विषयनिहाय प्राध्यापक आपणास सिलॅबसनुसार विषयांची माहिती देतील.

- सर्व सत्रांना उपस्थिती अनिवार्य आहे.

- सकाळी 10.00 ते 2.00 या दरम्यान संमंत्रण सत्रांचे ऑनलाईन पद्धतीने आयोजन होणार आहे. यासाठी आपण सोबत दिलेले वेळापत्रक काळजीपूर्वक बघावे.

- संमंत्रण सत्रात विषयनिहाय प्राध्यापक आपणास मार्गदर्शन करतील. व्याख्यान (Lecture) स्वरुप नसून एकूण संपूर्ण विषयाची माहिती सारांश रुपाने आपणास दिली जाणार आहे.

- Google Meet या माध्यमाद्वारे ऑनलाईन संमंत्रण सत्रे होत असल्याने विभागाद्वारे विषयनिहाय जे व्हॉटस ॲप ग्रुप तयार करण्यात आले त्यावर ती लिंक टाकण्यात येतील. Google Meet हे ॲप नसेल तर Play Stores वर जाऊन डाउनलोड करुन घ्यावे.

- कोणीही संमंत्रण सत्रे अर्धवट सोडू नये.

- Net Connectivity किंवा इतर कारणे सांगून अनुपस्थिती राहू नये. कारण आपणास शिक्षणक्रमाअंतर्गत नेमके काय काम करायचे आहे हे शेवटपर्यंत लक्षात येणार नाही.

- ऑनलाइन संमंत्रण सत्रावेळी आपले ऑडिओ बंद ठेवावे मात्र व्हिडिओ ऑन ठेवावा.

- विद्यार्थी म्हणून योग्य ते कपडे परिधान करुन आपणास सोईचे होईल आणि नेट सुविधा उत्तम मिळेल अशा जागेवर बसावे.

- शिक्षणक्रमांतर्गत येणाऱ्या सर्व अडचणींचे निराकरण संमंत्रण सत्रातच होईल. कारण संबंधित विषय प्राध्यापक आपणास संमंत्रण सत्रावेळीच वेळ देवू शकतात.

**❖ अध्ययन साहित्य बाबत**

- प्रवेशावेळी विभागाने शिक्षणक्रमांना उपलब्ध होणारे अध्ययन साहित्य हे ई-स्वरुपात असणार आहे याबाबत सविस्तर माहिती प्रवेश सूचनेत दिलेली आहे. नजरचुकीने जर आपण प्रवेश घेते वेळी वाचली नसेल तर माहिती काळजीपूर्वक वाचावी.

- Soft Copy ची लिंक आपल्या ग्रुप वर शेअर केली जाईल.

- अध्ययन साहित्य भाषा शिक्षणक्रम सोडून इतर विषयांचे मराठीच उपलब्ध असेल. अपवादात्मक विषयाचे साहित्य इंग्रजी माध्यमातून उपलब्ध होईल. परंतु काळजी करू नका, ज्या विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेतील साहित्य आवश्यक असेल त्यांना संमंत्रण सत्रात मार्गदर्शन करणारे प्राध्यापक संदर्भ कोठे उपलब्ध होतील याची माहिती देतील.

- नवीन शैक्षणिक धोरण 2020 नुसार सिलॅबस संरचना असुन शैक्षणिक वर्ष 2023-24 पासुनच लागू झाला आहे. सत्र पद्धती (Semester) असल्याने प्रत्येक विषयांतर्गत चार चार घटकांचा (Units) समावेश असणार आहे. प्रत्येक शिक्षणक्रम अंतर्गत स्वयं अध्ययन साहित्य विकसनाचे काम सुरु आहे. काही विषयांचे आशय संपादन कार्य सुरु आहे. सध्या जे साहित्य आपणास अभ्यासासाठी देत आहोत त्याचे संपादन कार्य पूर्ण झालेले नसल्यामुळे आशय त्रुटी, व्याकरणिक त्रुटी असण्याची शक्यता आहे. मात्र जे साहित्य आपणास सध्या उपलब्ध करून दिले आहे ते मात्र सिलॅबस प्रमाणेच सविस्तर देण्यात आले आहे. आपणास सर्व विषयांचे अध्ययन साहित्य दिले जाणार आहे. आपण काळजी करू नये.

**❖ अंतर्गत कार्य व लेखी परीक्षेबाबत**

- आपल्या शिक्षणक्रमाच्या अंतर्गत कार्यात कोणकोणत्या बाबींची पूर्तता करणे अनिवार्य आहे याबाबत विभागाद्वारे वेळोवेळी सविस्तर मार्गदर्शन केले जाईल.

- एम.ए.समुपदेशन मानसशास्त्र अंतर्गत Testing च्या Practical साठी आजीवन विभाग,जळगाव येथेच यावे लागणार आहे.त्याबाबत सूचना दिल्या जातील.

- सर्व शिक्षणक्रमाअंतर्गत परीक्षेचा पॅटर्न सत्र पद्धतीचा (Semester Pattern)असल्याने लेखी परीक्षा प्रति विषय 60 गुणांची तर अंतर्गत परीक्षा 40 गुण याप्रमाणे एकूण 100 गुणांची प्रती विषय याप्रमाणे परीक्षा होईल.

- 60 गुणांसाठी जी लेखी परीक्षा होते त्या परीक्षांचे आयोजन दरवर्षी जळगाव, धुळे, नंदुरबार या जिल्ह्यांत डिसेंबर-2023 च्या दुसऱ्या आठवड्यानंतर होईल. आणि द्वितीय सत्राची परीक्षा मे,2024 च्या पहिल्या आठवड्यानंतर होईल. यासाठी प्रत्येकास प्रत्यक्ष संबंधित केंद्रावर जाऊनच परीक्षा द्यावी लागणार आहे. परीक्षेबाबत सविस्तर सूचना विभागाद्वारे दिल्या जातील.

- 40 गुणांची अंतर्गत परीक्षा ऑनलाईन पद्धतीने डिसेंबरच्या 2023 च्या पहिल्या आठवड्यात आपल्या विभागाद्वारेच आयोजित केली जाणार आहे. त्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाईल.परीक्षेचे स्वरूप आपणास वेळापत्रकासोबत दिलेले आहे.

- प्रश्नपत्रिकेत भाषेचे शिक्षणक्रम सोडून इतर शिक्षणक्रमांसाठी प्रश्न मराठी आणि इंग्रजी भाषेत असतात.आपणास मराठी,इंग्रजी कोणत्या भाषेत उत्तरे लिहायची याबाबत विद्यार्थी निर्णय घेऊ शकतो. मात्र उत्तरे कोणत्यातरी एकाच भाषेत लिहावी लागतील. काही प्रश्न मराठी तर काही प्रश्न इंग्रजी भाषेत लिहिली असतील तर परीक्षेत गुणदान केले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

- परीक्षेचे अर्ज आणि परीक्षा केंद्रसंबंधित माहिती आपल्या ग्रुप मध्ये उपलब्ध करुन दिले जातील. त्याबाबत सविस्तर सूचना दिल्या जातील.

- परीक्षेचे वेळापत्रक व प्रवेश पत्रही ऑनलाईनच उपलब्ध होतील त्याबाबतची सूचना वेबसाईटवर तसेच व्हॉटस ॲप ग्रुप वरही पाठवली जाईल.

- प्रवेशावेळीच आपण परीक्षेचे शुल्क(fees) भरलेले असल्याने वर्षभर कोणतेही शुल्क भरायचे नाही. मात्र प्रथम सत्राची परीक्षा जर आपण दिली नाही,आणि दुसऱ्या सत्रात आपण प्रथम सत्राची परीक्षा देणार असाल तर तेव्हा repeater म्हणून लागू असलेले शुल्क भरावे लागेल याची नोंद घ्यावी. शक्यतो,आपण सत्र निहाय आयोजित होणाऱ्या परीक्षेच्या वेळीच परीक्षा द्यावी.

❖ **अत्यंत महत्वाचे :**

- प्रवेशावेळी आपला मोबाईल नंबर जो दिला असेल तोच शिक्षणक्रम पूर्ण होईपर्यंत कायम ठेवावा. जर तो व्हॉटसॲप नंबर नसेल तर आपण त्वरित आपला व्हॉटसॲप नंबर विभागास कळवावा.

- जर आपण अचानक मोबाईल नंबर बदलला व विद्यार्थ्यांनी जर मोबाईल नंबर बदलण्याचे कळविले नाही तर विभागाद्वारे शिक्षणक्रमांसंबंधीत वेळोवेळी जी माहिती व्हॉटस ॲप ग्रुप वर पाठवली जाते तर आपणास कोणतीही माहिती समजणार नाही याची आपण सर्वांनी नोंद घ्यावी.

- आपले सर्व संमंत्रण सत्रे व माहिती पोहोचविण्याचे व्हॉटसॲप आणि वेबसाईट हे माध्यम असणार आहे. म्हणून सर्वांशी ऑनलाइन पद्धतीने संवाद साधला जाणार आहे. यासंबंधी व्हॉटसॲप ग्रुप आणि वेबसाईट चेक करण्याची जबाबदारी आपलीच आहे.

- ज्या विद्यार्थ्यांची प्रवेशावेळी कागदपत्रांची अपूर्णता अपूर्तता असेल त्यांनी त्वरित विभागात संबंधित कागदपत्रे सादर करावीत.

- आपणास ज्या शंका असतील, काही अडचणी असतील तर वैयक्तिक रित्या मोबाईलवर संपर्क तसेच संदेश (Message) करु नयेत. आपण फक्त कामकाजाच्या दिवशी विभागात 10:30 ते 05:30 दरम्यान दूरध्वनी क्र.0257-2257495/2258496 यावर संपर्क साधू शकता. कार्यालयीन कामकाजानंतर व कामकाजापूर्वी सकाळी, संध्याकाळी, रात्री केव्हाही मोबाईलवर संपर्क साधू नये.

- आपणास ज्या अडचणी व शंका विचारायच्या आहेत त्याची एका कागदावर नोंद घेऊन व्यवस्थित एक-एक प्रश्न कार्यालयीन वेळेतच विचारावे. आपल्या सर्व प्रश्नांचे निरसन केले जाईल.

- वैयक्तिक कोणतीही कारणे पुढे करत अंतर्गत कार्य जमा करण्यास विलंब करणे व संमंत्रण सत्रांना उपस्थिती टाळता येणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी. कारण यामुळे आपणासच शिक्षणक्रम पूर्ण करतांना येणाऱ्या अडचणींना सामोरे जावे लागणार आहे.

- संमंत्रण सत्राचे जे वेळापत्रक आपणास दिलेले आहे. त्यानुसार विषयनिहाय संमंत्रण सत्रे होतील. परंतु काही कारणास्तव एखाद्या विषय प्राध्यापकांना काही अडचण आली तर त्याबाबत वेळापत्रकात बदल करायचा अधिकार विभागास आहे. कारण वेळापत्रकात थोडी लवचिकता असणार आहे. त्याबाबत आपल्या ग्रुप वर मेसेज विभागाद्वारे पोचवला जाईल.

- जर आपणास विभागात यायचे असेल तर विभागाच्या दूरध्वनीवर संपर्क साधूनच यावे. म्हणजेच आपले काम सहज शक्य होईल. जर आपण दूरध्वनी न करता विभागात आले आणि आपले काम झाले नाही तर त्यास आपण स्वतः जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

- आपल्या शिक्षणक्रमांतर्गत प्रवेश प्रक्रिया ते पदवी प्रदान पर्यंत कोणकोणते कार्य करायचे आहे त्याची संरचना व एकत्रित माहिती व्हिडिओच्या माध्यमातून आपणास व्हॉटसॲप ग्रुप वर पाठवली जाईल म्हणजे शिक्षण क्रमात मला नेमके काय करायचे आहे. हे मला माहितीच नाही याबाबत येणारी समस्या कमी होण्यास मदत होणार आहे.

- शिक्षण क्रमानुसार ऑनलाइन ओळखपत्र व्हॉटसॲप ग्रुप वर उपलब्ध करुन दिले जातील त्याची प्रिंट काढून घ्यावी.

- आपण सर्व विविध क्षेत्रात नोकरी तसेच व्यवसाय करणारे विद्यार्थी आहात. आपणाकडून विभागास सहकार्याची अपेक्षा असेल. आणि विभागाद्वारे ही आपणास सहकार्य कायम मिळणारच आहे. शिक्षणक्रम पूर्ण करतांना विभागाद्वारे वेळोवेळी ज्या ज्या सूचना किंवा काही झालेले बदल आपणास कळविल्यानंतर त्याचे सर्वांनी पालन करणे बंधनकारक राहील.

आपल्या शंकांचे निरसन करण्यासाठी विभागातील खालील दूरध्वनी क्रमांकांची नोंद घ्यावी.

**0257-2257495/2258496**

**विभागाचा संपूर्ण पत्ता खालीलप्रमाणे आहे.**

**मा.संचालक,**
**आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग,**
**डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम विद्यार्थी भवन,**
**पहिला मजला, रूम नं- 204/05,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,**
**जळगाव-425001**

## शिक्षणक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यास विभागाद्वारे शुभेच्छा.

**प्रा.डॉ.आशुतोष आर.पाटील**
**मा.संचालक,**
**आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग,**